# बृहन्मुंबई महानगरपालिका

No. A.E. /SWM/14718/S Dt. 05.03.2026

**विषय:** 'एस' विभागातील रस्ते स्वच्छता योजना, मॅनिंग व मॉपिंग योजना व मोटर लोडिंग एन.जी.ओ. पुरुष कामगार पुरवठा योजना अंतर्गत दि. 01.04.2026 ते 30.09.2026 सहा महिन्याच्या कालावधीसाठी अशासकीय संस्थाची नियुक्ति करणेबाबत.

## स्वारस्य अभिव्यक्ती

स्वच्छतेच्या विविध योजनाद्वारे संस्थाची नियुक्ति करण्यासाठी `एस` विभाग कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, स्थानिक मंडळे, बचत गट अशासकीय संस्था इ. संस्थेमार्फत कामगारांचा पुरवठा करण्याकरीता संस्थांची पात्रता यादी तयार करुन लॉटरी पद्धतीने संस्थांची निवड करुन काम करण्याकरीता अर्ज मागवीत आहे. (कालावधीः दि. 01.04.2026 ते 30.09.2026)

| अनु.क्र. | कार्यरत योजना | निविदा छाननी शुल्क |
|---|---|---|
| 1 | रस्ते स्वच्छता योजना | 2400/- + 18 टक्के GST |
| 2 | मोटर लोडिंग योजना (एन.जी.ओ. पुरुष कामगार) | 2400/- + 18 टक्के GST |
| 3 | मॅनिग व मॉपिंग योजना | 2400/- + 18 टक्के GST |

`एस` विभाग कार्यालयातील सहा. अभि. (घ.क.व्य.) खातेमार्फत उपरोक्त नमुद योजनावार निविदा रक्कम दि. 01.04.2026 ते 30.09.2026 सहा महिन्याच्या कालावधीसाठी दि. 09.03.2026 ते दि. 16.03.2026 रोजी सकाळी 10.30 ते सायं. 05.00 वाजेपर्यंत संस्थांकडुन अर्ज स्विकारुण निविदा छाननी शुल्क रोख स्वरुपात (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र (C.F.C.) येथे चलणाद्वारे भरणा केल्यानंतर निविदा अर्ज नमुना देण्यात येईल. योजनावार निविदा अर्ज कार्यालयात जमा करण्याची विस्तृत सूचना दि. 17.03.2026 रोजी सहा. अभि. (घ.क.व्य) `एस` विभाग कार्यालयाच्या सुचना फलकावर लावण्यात येईल. त्यानुसार सर्व संस्थेने आपले अर्ज या कार्यालयाकडे सादर करतेवेळी आपले (संस्थेचे व पदाधिका-याचे) सर्व मुळ कागदपत्रे आणुन या कार्यालयाच्या अधिका-यामार्फत आपल्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव/खजिनदार सोबत पडताळणी करुनच सादर करावे. पडताळणी करण्यात न आलेले अर्ज स्वारस्य अभिव्यक्तिकरीता पात्र म्हणुन ग्राह्य धरण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी. पडताळणीमध्ये पात्र ठरल्यानंतर स्वीकारलेल्या अर्जाच्या आधारे पात्रता यादी तयार करुन लॉटरी पद्धतीने संस्थांची निवड करण्यात येईल. यशस्वी ठरलेल्या संस्थांना योजनांच्या अटी व शर्तीनुसार स.मु.प./सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) कामाचे वाटप करतील.

विशेष सुचना-

1. उपरोक्त नमुद सर्व योजनाचा कालावधी सहा महिन्याचा असला तरी वरीष्ठाच्या निर्णयानुसार कालावधी कमी किंवा एन.जी.ओ. च्या संख्येमध्ये बदल करण्यात येवू शकतो.

2. ज्या संस्थांनी/मंडळांनी/बेरोजगार सेवा संस्थांनी आपले सभासद बदलले असतील त्यांनी बँकमध्ये देखील ते सभासद बदलले असल्याबाबतचे मुळ पुरावे व संबंधित संस्था नोंदणी प्राधिकरणाकडे त्यांची सुनावणी झाल्याबाबतचे पुरावे सादर केल्यानंतरच ग्राह्य धरण्यात येतील याची नोंद घ्यावी. ज्या संस्थांनी Change of Report करीता संबंधित प्राधिकरणाकडे (धर्मादाय आयुक्त, कोकण भवन) फक्त अर्ज सादर केल्याबाबतची प्रत सादर केल्यास अशा संस्थांचा अर्ज विचारात घेण्यात येणार नाही. याची नोंद घेण्यात यावी. (याबाबत यापुर्वी देखील सुचना फलकावर सुचना प्रासारीत करण्यात आली होती.)

सही/

सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) `एस` विभाग